स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
मानवविज्ञान विद्याशाखेच्या अंतर्गत मराठी विषयातील पीएच.डी.संशोधना करिता सादर केल्या जाणाऱ्या संशोधन प्रबंधाची स्थुल रुपरेषा.

“मराठवाडयातील पारंपरिक लोककला : गोंधळ विधीनाटयाचा चिकित्सक अभ्यास”.

संशोधक विद्यार्थी

नवरखेले बालाजी विठ्ठलराव

मार्गदर्शक

प्रा.डॉ.राजू सायन्ना बडूरे

सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग

श्री. शिवाजी महाविद्यालय, परभणी

जि.परभणी.

“मराठवाडयातील पारंपरिक लोककला : गोंधळ विधीनाटयाचाचिकित्सक अभ्यास”.

प्रस्तावना:-

महाराष्ट्रात अनेक रुढी अनेक परंपरा,धार्मिक विधी या प्राचिन काळापासून चालत आलेल्या आहेत. या धार्मिक विधी प्रकारातीलच एक प्रकार म्हणजे गोंधळ विधीनाटय होय. या लोककलेला महाराष्ट्राच्या लोकसंस्कृतीमध्ये मोठे मानाचे स्थान आहे. गोंधळ विधी नाटयाची परंपरा अतिप्राचीन म्हणजे इ.स. चौथ्या, पाचव्या शतकापासून चालत आलेली आहे. ती परंपरेने आजही जीवंत आहे. “आई राधा उदे उदे” या जयघोषाने संपुर्ण महाराष्ट्रच नव्हे तर भारताच्या अनेक भौगोलिक भागामध्ये जसे की, महाराष्ट्र कर्नाटक, आंध्रप्रदेश, तामिळनाडू, दक्षिण भारत, उत्तर भारतात कुळधर्म कुळाचार म्हणून शुभ कार्याच्या, मंगलकार्याच्या समारोपाला हा गोंधळ विधी नाटय लोककलाप्रकार सादर केला जातो.

प्राचिन काळापासून महाराष्ट्राची लोककला जपण्याचे कार्य गोंधळ विधीनाटयाच्या स्वरुपात आजही आपणास पाहण्यास मिळते. महाराष्ट्राच्या लोकसंस्कृतीचा आधार स्तंभ लोकगीते, लोकभुमिका, लोकसाहित्य आहेत असे म्हणण्यास हरकत नाही. मौखिक परंपरेच्या माध्यमातून महाराष्ट्राची लोककला भक्कमपणे उभी असलेली आपल्याला अनुभवास मिळते. एक मौखिक परंपरा ज्यामध्ये नृत्य, नाटय, गीते, संवाद, निरुपन, आख्यान, लोकभुमिका यांच्या मिश्रणाने मराठामोळा लोकरंग उभा राहिला तो गोंधळ विधीनाटयाच्या रुपात. परंपरेने चालत आलेल्या या लोककलेमध्ये मनोरंजनाबरोबर प्रबोधन कार्यही घडत असते. तसेच गोंधळ विधीनाटयात मानवी मुल्याची जपणूक, जडण घडन होत असते. जीवन जगत असतांना मानवी मूल्यांना अनन्य साधारण महत्व आहे. ते गोंधळविधीनाटय सादरीकरणातून अभिव्यक्त होत असतात. म्हणूनच तर महाराष्ट्रातील भक्तीसांप्रदयातील महान अशा अनेक संतानी गोंधळावर रुपके केली आहेत. गोंधळ विधीनाटयाला भारुडाच्या रुपातून सादर करुन गोंधळ विधीनाटयाचे महत्व स्पष्ट केले आहेत. ते अशा स्वरुपात ‘सुदिन सुवेळ तुझा मांडाला गोंधळ पंचप्राण दिवटया दोन्ही नेत्र हिल्लाळ’. अशा प्रकरची विविध रुपके भारुडाच्या माध्यमातून गोंधळ विधीनाटयाबददल आपल्याला पहावयास मिळतात.

लहाणपणापासून या गोंधळ विधीनाटयाविषयी मला आवड आहे. याचे कारण म्हणजे माझे वडिल कै. विठठलराव पिराजी नवरखेले यांनी आयुष्यभर गोंधळ विधीनाटयाची परंपरा जपली, गाजवली आणि कुळधर्माचा वारसा जपला. त्यांच्या सोबत मला गोंधळ विधीनाटय सादर करण्याचा, पायात घुंगरु बांधून लहाणपणी गोंधळ

विधीनाटयात नृत्य सादर करण्याचा योग लाभला. तो छंद, आवड, नाद आजही माझ्या अंगी ठासून भरलेला आहे. अभिमान वाटतो मला या कुळधर्मामध्ये जन्माला आलो. या गोंधळी धर्माचा, गोंधळ विधीनाटयाच्या पवित्रतेचा. गोंधळ विधीनाटयातून अभिव्यक्त होणाऱ्या मानवी मूल्यांचा.

गोंधळ विधीनाटयाच्या माध्यमातून मराठी माणसाचे भावदर्शन जपण्याचे कार्य प्राचिन काळापासून होत आहे. म्हणूनच तर माझ्या भावना विश्वात गोंधळ विधी नाटय लोक कलेची परंपरा काय आहे? लोकाविष्कार, प्राचिनत्व, आध्यात्मिक रुपके, लोकरंगभुमिच्या माध्यमातून लोकसंस्कृतीत जपलेले मानाचे स्थान काय आहे?, गोंधळ विधीनाटय सादरीकरणाची पध्दती, निरुपान, गोंधळ विधीनाटयाचा भक्तीप्रवास, गोंधळ विधी नाटयातील पारंपरिक वाद्य, मानवी मूल्य कोणकोणती अभिव्यक्त होतात. लोकगीते या सर्वांचा एकत्रित सुक्ष्म विचार होणे गरजेचे आहे. म्हणून गोंधळ विधीनाटयाच्या मर्मतेचा विचार करुण गोंधळ विधीनाटयतील अभिव्यक्त होणाऱ्या मानवी मूल्य या विषयावर संशोधन होणे गरजेचे आहे असे मला वाटते.

रात्रभर चालणारा गोंधळ, सर्व धर्मात मानाचे स्थान आहे. याचे कारण यातील आध्यात्मिकता, धार्मिक परंपरा, सादरीकरणाचे मानवी मूल्य होय. या विधीनाटयामध्ये प्रत्यक्ष काय काय घटते ते स्वत: अनुभवलेले असल्यामुळे हा संशोधन विषय आवडीचा आहे. धार्मिक भक्ती, आदिमायाशक्तीवरील अतुट विश्वास, श्रध्दा, प्रबोधन, मानवी मूल्य जसे की, व्यापक दृष्टीकोन, शहाणपण, समाजिक न्याय, समानता, सदभावना, व्यापक आनंद, धार्मिक आदर, वैज्ञानिक दृष्टिकोन कश्या पध्दतीने व्यक्त होतात. या कुतुहलातूनच गोंधळ विधीनाटय या विषयावर संशोधन करण्याचा प्रयत्न करणार आहे. तसा मानस केला आहे.

गोंधळ विधीनाटयाची परंपरा, स्वरुप, सादरीकरणातील अविष्कार, महत्व, गरज, गोंधळ, विधीनाटयाचे बदलते स्वरुप, गोंधळ विधीनाटय सादर करणाऱ्या लोककलावंताची घटणारी लोकसंख्या, कलावंतांना जडलेले व्यसन, लोककलावंतामध्ये वाढत चाललेली. बेरोजगारी, शहराकडे स्थलांतर केवळ भिक्षूक म्हणून समाजाचा पाहण्याचा दृष्टीकोन, लोकगीताच्या बदलत चाललेल्या चाली, गोंधळ विधीनाटयातील संपत चाललेले मर्म, बारकावे, धर्मनिष्ठा, गोंधळ विधीनाटय लोप पावण्याची भिती, शासनाचे निवडक कलावंताना तुटपुंजे, आक्समिक, कलांतराने कधीतरी मिळणारे मानधनम्हणजेच असातत्यता, कलावंताच्या निवडीतही राजकारण्याचा हस्तक्षेप, गोंधळ विधीनाटयाला शास्त्रीय अधिष्ठाण प्राप्त होणे, प्रबोधनातून जीवन मूल्यांची जपवणूक होणे, खऱ्या जातीवंत लोककलावंताचा शोध, कलावंताची भुकमारी, उपासमार, बेरोजगारी, गोंधळ विधीनाटयावरील कमी होत चाललेला विश्वास, धार्मिक परंपरा म्हणून केवळ पुजा-आर्चनेला दिले जात असलेले महत्व, विधीनाटयापासून ते लोकनृत्य असा झालेला बदल, हाच गोंधळ विधीनाटय प्रकार पुढे भविष्यात मूळ गोंधळ

विधीनाटय म्हणून स्विकार होतो की काय?, भविष्यात एक-दोन तासावर आलेली गोंधळ विधीनाटय लोककला लोप पावेल का? इंटरनेटच्या विविध सांधनांचा विधीनाटयावरील दुष्परिणाम, या पाठीमागील कारणे शोंधण्याचा व उपाय सुचविण्याचा प्रयत्न गोंधळ विधीनाटय विषयावरील संशोधनातून करणार आहे. या दृष्टिकोणातून मराठवाडयातील पारंपारिक लोककला गोंधळ विधीनाटयाचा चिकित्सक अभ्यास केला जाईल.

संशोधनाची गरज व महत्व:-

महाराष्ट्र हा लोककलेच्या परंपरेने नटलेला भारतातील एक प्रमुख राज्य आहे. या लोककलेचा प्रमुख आधार म्हणजे लोकभुमिका, लोकगीते, लोकसाहित्य होय, समाजसमुहाची जाणीव जागृती करणारा, लोककलेतून आध्यामिक ज्ञानाची मानवी जीवनमूल्याशी जोड घालून देणारा लोककलेचा एक महत्वपुर्ण कलाप्रकार म्हणजे गोंधळ विधीनाटय होय. प्राचिन काळापासून म्हणजेच महानुभव पंथाच्या अगोदर पासून परंपरने चालत आलेला गोंधळ विधीनाटय प्रकार, ज्या परंपरेतुन सामान्य माणसात सुध्दा ज्ञानप्रबोधनाचे कार्य करत आलेला लोककला प्रकार आहे. संगित, नृत्य, नाटय, लोकभुमिका, मानवी जीवन मूल्य, मनोरंजन, उदबोधन सादर करणारा हा लोककला प्रकार आजही महाराष्ट्र राज्यात खंबीरपणे आपले पाय रोवून लोककलावंताची, महाराष्ट्राच्या लोक संस्कृतीची परंपरा जागवत आहे.

आजही आपण पहातो की, कोणत्याही मंगल कार्याच्या समारोपाच्या वेळी किंवा कुळधर्म कुळाचार म्हणून गोंधळ विधीनाटयाचा लोककला प्रकार आयोजित करण्यात येतो. या पाठीमागचे महत्वपुर्ण कारण म्हणजे या गोंधळ विधीनाटयाच्या सादरीकरणाची पध्दती, अध्यामिक ज्ञानाची मानवी जीवन मूल्यांशी जोड, श्रध्दा, प्रबोधन कार्य होय. या ठिकाणी समाजाच्या सर्वांगीण बाबीचा विचार गोंधळ विधीनाटयात केला जातो. म्हणून आजच्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगामध्ये परंपरेने चालत आलेल्या सर्वगुणसंपन्न लोक कलेचा ऱ्हास होवू नये, गोंधळ विधीनाटय लोककलाप्रकार सादर करणारे कलावंत संपुष्टात येवू नये, गोंधळ विधीनाटयाची परंपरा कायम टिकूण राहावी, गोंधळ विधीनाटय लोककला प्रकाराचा आधुनिक युगाला विसर पडू नये, गोंधळ विधीनाटयातून अभिव्यक्त होणारे मानवी मूल्यांचा उपयोग समाज विकासाच्या उपयोगात यावे. या लोककला प्रकारातील प्रबोधन कार्याचे महत्व जणसमुदायामध्ये टिकूण राहावे. जे. कप. ग्रीम या लोकसाहित्याच्या अभ्यासकाच्या मताप्रमाणे लोकसमुदयातील लोकमाणसाची, लोकमनाची, समूहमनाच्या भावविश्वाचा विचार केला तर लोककला टिकून राहिला पाहिजे. म्हणून गोंधळ विधीनाटयावर संशोधन होणे गरजेचे आहे. असे संशोधक विद्यार्थी म्हणून महत्व व गरज वाटते. महाष्ट्राच्या प्राचिन सांस्कृतिचा विचार केला तर लोककला ही महत्वाची आहेअसे वाटते.

संशोधन समस्येचे विधान:-

मराठवाडयातसादर करण्यात येत असलेल्या पारंपरिक लोककला प्रकार गोंधळ विधीनाटयाचा चिकित्सक अभ्यास, पारंपरिक गोंधळ विधी, आख्यानाचे संकलन करणे, समाज प्रबोधन, मनोरंजन विषयक, जीवन मूल्य, देवी महात्मयाचा शोध आढावा घेणे.

संशोधनाची उद्‌दिष्टे :

संशोधकाला शास्त्रशुध्द पध्दतीने संशोधन करता यावी म्हणून प्रस्तुत विषयाची खालील उद्‌दिष्टे आहेत.

१. गोंधळ विधी नाटयातून अभिव्यक्त होणाऱ्या मानवी मूल्यांचा शोध आढावा घेणे.
२. गोंधळ विधीनाटयाच्या पुरानत्वाचा शोध घेणे.
३. गोंधळ विधीनाटयाची परंपरा विषद करणे.
४. गोंधळ विधीनाटयाचे सांस्कृतिक महत्व विषद करणे.
५. गोंधळ विधीनाटयाशी संबंधित साहित्याचा शोध आढावा घेणे.
६. गोंधळ विधीनाटयातून होणारे समाज प्रबोधनाचे मनोरंजनाचे महत्व विषद करणे.
७. गोंधळ विधीनाटयाच्या सादरीकरणाचा क्रम स्पष्ट करणे.
८. गोंधळ विधीनाटयाच्या सादरीकरणातून समाजाच्या भावविश्वाचा शोध घेणे.
९. गोंधळ विधीनाटयातील पारंपारिक गोंधळगीते, आख्यानाचे संकलन करणे.

संशोधनाची गृहितके :-

मराठवाडयातील पारंपरिक लोककला : गोंधळ विधीनाटयाचा चिकित्सक अभ्यास या संशोधनाची गृहितके पुढील प्रमाणे.

१. पारंपरिक लोककलेतून समाजाच्या भावविश्वाचे दर्शन घडते.
२. समाजमनात मौखिक लोककलेची परंपरा अविरतपणे चालत असते.
३. लोककलेचे मूळ स्वरुप कायम टिकवून ठेवण्याची योग्यता गोंधळ विधीनाटयात असते.
४. गोंधळ विधीनाटयातून मानवी जीवन मूल्यांची जपवणूक होत असते.
५. मौखिक परंपरेने चालत आलेल्या लोककलेत काळानुसार होत असलेले बदल समावून घेण्याचे बळ गोंधळ विधीनाटयात असते.
६. लोककलेची निर्मिती समाजाच्या चालीरिती, धर्म परंपरेतून होत असते.
७. लोककलाप्रकार हा समाज जीवनाचा आरसा असतो.
८. पारंपरिक गोंधळ विधीनाटयातून समाज जीवनाचे कौटुंबिक जीवनदर्शन घडते.
९. आदिमायाशक्तीवरील असलेली अतूट श्रध्दा गोंधळ विधीनाटयातून व्यक्त होत असते.

१०. गोंधळ विधीनाटय लोककला प्रकारातून समाज प्रबोधन, मनोरंजन, घडत असते.
११.गोंधळ विधीनाटयातून लोककलेच्या परंपरेची जपणूक होत आहे.
१२.गोंधळ विधीनाटय लोककला प्रकारातून महाराष्ट्राच्या बहूविध सांस्कृतीची जपणूक आहोरात्र चालत आहे.

संशोधनाच्या परिकल्पना :-

१. लोककला गोंधळ विधीनाटयातून लोकमानसाची प्रचिती येते.
२. महाराष्ट्राच्या लोक परंपरेचे गोंधळ विधीनाटयाला सांस्कृतिक अधिष्ठान आहे.
३. पारंपरिक लोककलेने जतन केलेल्या कलात्मक सांस्कृतीचा वारसा गोंधळ विधी नाटयात आहे.
४. लोकमनाच्या भावविश्वाला जतन करण्याचा लोककला प्रकार गोंधळ विधीनाटय आहे.
५. आदिमायाशक्ती भवानीदेवीच्या अदभूत शक्ती महात्म्यावर लोकसमूहाचा अतुट विश्वास आहे.
६. गोंधळ गीतातून समाजाच्या कौटुंबिक जीवनविषयक, सांस्कृतिकविषयक प्रचिती येते.
७. गोंधळ विधीनाटयाच्या सादरीकरणाचा समाज मनावर अतुट विश्वास आहे.
८. गोंधळ विधीनाटयाचा कलात्मक दर्जा खालावत चाललेला दिसून येत आहे.
९. मूळ गोंधळ विधीनाटय आणि आधुनिक गोंधळ विधीनाटयात तफावत दिसून येत आहे.

संशोधनाची व्याप्ती :-

प्रस्तुत संशोधनासाठीपारंपारिक गोंधळ विधीनाटयाचाचिकित्सक अभ्यास परिपुर्ण करण्यासाठी मराठवाडयातील जिल्हायाची निवड करण्यात आली आहे.

संशोधनाची मर्यादा :-

दर बारा कोसावर भाषा, कलाप्रकार बदलतो तसे महाराष्ट्रातील विविध भौगोलिक भागात सादर करण्यात येत असलेल्या लोककला प्रकारापैकी एक गोंधळ विधीनाटयाच्या सादरीकरणातही थोडा फार बदल असू शकतो. जसे गोंधळ गीताच्या चाली, गोंधळ विधीची रुपरेषा, आख्यान सांगण्याची पध्दत इत्यादी मध्ये बदल असू शकतो.

गोंधळ विधीनाटयाचा चिकित्सक अभ्यास होण्यासाठी भारतातील सर्व भौगोलिक प्रदेशातील गोंधळ परंपरेचा अभ्यास होणे अपेक्षीत आहे. परंतुभारतातील भौगोलिक क्षेत्र खूप मोठे असल्या कारणाने यात अनेक राज्य व जिल्हे असल्या कारणाने संशोधन विषयावर काही मर्यादा पडत असल्यामुळे व संशोधकाच्या वैयक्तिक मर्यादेमुळे

मराठवाडयातील सर्व जिल्हयातील पारंपरिक गोंधळ विधीनाटयाचाचिकित्सक अभ्यास विविध घटकांच्या, मुद्यांच्या, मानवी जीवन मूल्यांच्या आधारे करण्यात येणार आहे.

संशोधनाची कार्यपध्दती :-

संशोधनाच्या विविध पध्दती आहेत जसे की,तौलनिक पध्दती, ऐतिहासिक पध्दती, क्षेत्रिय पध्दती, वैज्ञानिक पध्दती, सूक्ष्म संहिता चिकित्सा पध्दती. सर्वेक्षण पध्दती, वर्णात्मक पध्दती.

प्रस्तुत संशोधनासाठी प्रामुख्याने वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा वापर केला जाईल. सदर संशोधनामध्ये प्राचीन गोंधळ गीते, आख्याने आशयाचा मानवी मूल्याच्या दृष्टिकोनातून गोंधळ विधीनाटयाचा चिकित्सक अभ्यास करावयाचा आहे. म्हणून वर्णनात्मक संशोधन पध्दती प्रस्तुत संशोधनासाठी निवडण्यात आली असून या पध्दतीने संशोधन कार्य पुर्ण करण्यात येईल.

संशोधन साधने :-

पारंपारिक गोंधळ विधीनाटयाचेसंशोधन करतांना संशोधनासाठी अनेक उपयुक्त साधने आहेत जसे हस्तलिखीते, दैनंदिन पत्रके, अभिलेख, ग्रंथालये, प्रश्नावली, मुलाखत, संगणक, अंतरजाल इत्यादी साधने उपयुक्त ठरतात. प्रस्तुत संशोधनासाठी आवश्यकतेनुसार योग्य त्या संशोधन साधनाचा उपयोग केला जाईल. आवश्यकते नुसार प्राथमिक दुय्यम संशोधन साधनाचा उपयोग केला जाईल.

संशोधन प्रकरण योजना :-

प्रकरण १ले : मराठी लोकसाहित्यातील लोककला :

प्रस्तुत प्रकरणात लोकसाहित्याची संकल्पना, लोकसाहित्याची व्याख्या, लोकसाहित्याची व्याप्ती, लोकसाहित्याच्या अभ्यासाचे महत्व, मराठी लोककला म्हणजे काय? लोककलेचे वैशिष्टे, मराठी लोकसाहित्यातील निवडक लोककला-कीर्तन, लळीत, तमाशा, दशावतार, गोंधळ,पोतराज, बहुरुपी, वासुदेव इत्यादी घटकांचा या प्रकरणामध्ये सविस्तर अभ्यास करण्यात येईल.

प्रकरण २रे : मराठी लोकसाहित्यातील गोंधळ विधीनाटय : एक लोककला.

प्रस्तुत प्रकरणात गोंधळ विधीनाटयाचा इतिहास, व्युत्पत्ती, व्याख्या,गोंधळ विधीनाटयाचे प्रकार, गोंधळविधीनाटयातील पारंपरिक वाद्य, गोंधळ विधी नाटयाचे सादरीकरण, गोंधळ विधीनाटयाचे बदलते स्वरुपइत्यादी बाबीचा या प्रकरणामध्ये सविस्त्र अभ्यास करण्यात येईल.

प्रकरण ३रे : गोंधळ विधीनाटयातील गोंधळगीते व आख्यानाचे संकलन व विश्लेषण.

प्रस्तुत प्रकरणात प्राचीन काळापासून चालत आलेल्या गोंधळ गीताचे व आख्यानाचे संकलन करुण त्याचे सविस्तरपणे विश्लेषण करण्यात येईल.

प्रकरण ४थे : गोंधळ विधीनाटयातून अभिव्यक्त होणारी जीवन मूल्य.

प्रस्तुत प्रकरणात गोंधळ विधीनाटयाच्या सादरीकरणातून अभिव्यक्त होणारी जीवनमूल्ये जसे की, व्यापक दृष्टिकोन, शहाणपण, सामाजिक न्याय, समानता, सदभावना, धार्मिक आदर, व्यापक आनंद, वैज्ञानिक दृष्टिकोन इत्यादी जीवनमूल्यांचा अभ्यास करण्यात येईल.

प्रकरण ५ वे : उपसंहार व निष्कर्ष :-

प्रस्तुत प्रकरणात संशोधनाच्या वरील चारही प्रकरणाचा आढावा घेण्यात येईल व त्याच बरोबर प्रस्तुत संशोधनांती हाती आलेले महत्वपुर्ण निष्कर्ष मांडण्यात येईल.

प्रकरण ६ वे : परिशिष्टे :-

परिशिष्टे: -

१. मुलाखती

२. वर्तमानपत्रे कात्रण

३. पत्र व्यवहार

४. गोंधळ विधीनाटय व आदिमायाशक्ती देवीचे छायाचित्रे

संदर्भग्रंथसूची :-

अ) ढेरे रा.चिं. : 'लोकसंस्कृतीचे उपासक',पद्मगंधा प्रकाशन-पूणे. २००८.

आ) ढेरे रा.चिं. : 'लोकदैवतांचे विश्व', पद्मगंधा प्रकाशन-पूणे. (१३ डिसेंबर २०१८)

इ) ढेरे रा.चिं. : 'भारतीय रंगभूमीच्या शोधात', पद्मगंधा प्रकाशन-पूणे. (सन १९८६)

ई) देखणे रामचंद्र : 'महाराष्ट्राची सांस्कृतीक लोककला', पद्मगंधा प्रकाशन-पूणे. ९ जानेवरी२०१७).

उ) देवप्रभाकर : 'परंपरा आणि परिवर्तन एक चिंतन', शशिकांत पिंपळापूरे, विद्या बुक्स पब्लिशर्स औरंगपुरा, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती-२०२२.

ऊ) देखणे रामचंद्र : 'गोंधळ-परंपरा स्वरुप आणि अविस्कार' अरुण जाखडे पद्रमगंधा प्रकाशन एरंडवन पुणे-४११०३८, त्रितीयावृत्ती, २३ मार्च २०१२.

ए) देखणे रामचंद्र : 'बहूरुपी महाराष्ट्र', पुणे साहित्य वितरण-पूणे.

ऐ) धार्मिक पंजिका : आर्ष वाङमय : 'श्री देवी माहात्म्य', (प्राकृत सप्तशती), मो.द.नांदुरकर, अनमोल प्रकाशन ६८३ बुधवार पेठ पुणे-२, आवृत्ती-१९९८.

ओ) नाईक कृष्णकांत : 'श्री दुर्गादेवी उपासना', अक्षयविद्या प्रकाशन-पूणे.

औ) भोबे गोपालकृष्ण : 'कलत्मक गोमंतक', कला अकादमी गोवा, दमण व दीव पणजी-गोवा, प्रथमावृत्ती-१९७२.

अं) मांडे प्रभाकर : 'मौखिक वाङमयाची परंपरा-स्वरुप आणि भवितव्य', गोदावरी प्रकाशन औरंगाबाद, आवृत्ती पहिली, २४ मार्च २०१०.

अ:) मांडे प्रभाकर : 'लोकसाहत्यिाचे स्वरुप', गोदावरी प्रकाशन, अहमदनगर, आवृत्ती सहावी, जानेवारी २०१८

क) मांडे प्रभाकर : 'लोकरंगभुमी', गोदावरी प्रकाशन, सावेडी, अहमदनगर, आवृत्ती तिसर, २३ जूलै २०१८.

ख) मोरजे गंगाधर : 'लोकसाहित्य बदलते संदर्भ-बदली रुपे,' पद्मगंधा प्रकाशन-पूणे.

ग) मांडे प्रभाकर : 'सांकेतिक आणि गुप्त भाषा' गोदावरी प्रकाशन औरंगपूरा-औरंगाबाद. (२०१०)

घ) मांडे प्रभाकर : 'लोकसाहित्याचे अंत:प्रवाह', गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद (13

डिसेंबर २०१८)

च) लिमये हरिभाऊ : ‘कुलदेवी’ (कुलदेवता विशेषांक २०००), लिमये विश्वप्रकाश पब्लिकेशन्स प्रा.लि.

छ) व्यवहारे शरद : ‘मराठी लोकगीते स्वरुप विशेष’, विश्वभारती प्रकाशन- नागपूर- १९९९.

ज) वाडकर धोंडिराम : ‘लोककला’, दस्ताने रामचंद्र आणि कंपणी,८३०-सदाशिव पेठ, पूणे-३०, आवृत्ती पहिली,सन २०००.

झ) वाकोडे मधूकर / करोगल सुषमा : ‘मौखिकता आणि लोकसाहित्य’, साहित्य अकादमी, आवृत्ती पहिली, २००१.

२१. mr.wikipedia.org.

२२. w.w.w.maayboli.com

२३. w.w.w.aplemarathijagat.forumotions.in

संशोधन विद्यार्थी
नवरखेले बालाजी विठ्ठलराव

मार्गदर्शक
प्रा.डॉ. राजू सायान्ना बड्डुरे
सहयोगी प्राध्यापक,
मराठी विभाग,
श्री. शिवाजी महाविद्यालय,
परभणीजि. परभणी